लोकमत पु. पान क्र. 1



नालासोपारा पूर्वेकडील डोंगरपाडालगतच्या जंगलात बेकायदेशीररीत्या हातभट्टी दारू तयार करणारे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले.

# वसईत हातभट्टी दारूच्या दोन अड्ड्यांवर छापा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या दोन अड्ड्यांवर छापा टाकून लाखोंचा मुद्देमाल नष्ट करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी सपोनि शिवकुमार गायकवाड यांनी बुधवारी दिली आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांना नालासोपारा पूर्वेकडील सागपाडा, डोंगरपाडालगतच्या जंगलात बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टी दारू तयार करणारे दोन मोठे अड्डे असून तेथे मोठ्या प्रमाणात गावठी हातभट्टी दारू तयार होत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी बुधवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास या परिसरात छापा घालून कारवाई करण्यात आली.

## पोलिसांत गुन्हा दाखल

या कारवाईमध्ये १ लाख ५६ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. त्यात १५२० लिटर नवसागर गुळमिश्रित वॉश, दोन तांबा धातूच्या टाक्या, दोन तांबा धातूचे थाळीचा टाय (सतेले), दोन लाकडी चाटू त्यास स्टिल धातूची नळी असलेले अशी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने मिळून आली. आरोपीविरुद्ध पोलिस अंमलदार तुषार दळवी यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-३ चे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, सपोनि सोपान पाटील, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, हवालदार मनोज चव्हाण, मुकेश तटकरे आदींनी केली आहे.

# रिक्षाचालकाच्या खुनाचा नायगावमध्ये प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नायगावच्या जुचंद्र गावातील चंद्रपाडा येथे राहणाऱ्या नीलेश परेट (वय ३१) या रिक्षाचालकाच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना सोमवारी रात्री घडली आहे. नायगाव पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

नीलेश हा आरोपी गणेश पवार याच्या मैत्रिणीशी फोनवर बोलल्याच्या कारणावरून दोघांत वाद झाला होता. तेव्हापासून आरोपी नीलेशकडे रागाने बघत असे. सोमवारी रात्री साडेबाराच्या सुमारास चंद्रपाडा नाक्यावर आरोपी गणेश हा त्याच्या रिक्षातून येऊन 'निलू, चल रिक्षात बस,' असे बोलल्यावर नीलेशने रिक्षात बसण्यास नकार दिला. यावेळी आरोपी त्याच्या शर्टाची कॉलर पकडून शिवीगाळ करीत होता. त्यावेळी नीलेशला सोडवून घरी घेऊन जात असताना आरोपीने नीलेशला जीवे मारण्याच्या उद्देशाने रिक्षा त्याच्या पाठीमागून अंगावर घातली. यात त्याच्या पायाला दुखापत झाली आहे.

# शिडीवरून पडून तरुणाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नायगावच्या ससूपाडा येथील संभाजी इंडस्ट्रिअल कॉम्प्लेक्स येथे छताचे पत्रे लावण्याचे काम मंगळवारी सुरू होते. कबीर शेख (वय २६) आणि मुसारदीर शेख (वय २५) हे दोघे काम करत असताना मुसारदीर हा छताचे पत्रे लावण्यासाठी शिडीने चढत होता. तो अर्ध्यापेक्षा जास्त उंचीवर चढला होता व फिरोज खाली शिडी धरून उभा होता. अचानक मुसारदीर शिडीवरून फिरोजच्या अंगावर पडला. त्यामुळे दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी ऑर्बिट येथे भरती केले होते. उपचारादरम्यान मुसारदीरचा मृत्यू झाला आहे. नायगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पू. पान क्र. 1

# साप चावल्याने मुलीचा मृत्यू

नालासोपारा : सायवन येथील पोस्ट लेंडीपाडा येथे राहणाऱ्या काजल भोईर (वय १७) या अल्पवयीन मुलीचा साप चावल्याने मृत्यू झाला आहे. तिला २० ऑक्टोबरला रात्री १२ वाजण्याच्या सुमारास डाव्या मांडीजवळ साप चावल्याने तिला प्रथमोपचारासाठी भिवंडी सरकारी रुग्णालयात नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तिला तपासून पुढील उपचारासाठी ठाणे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठवले. तिथे तिच्यावर उपचार सुरू असताना २४ ऑक्टोबरला संध्याकाळी मृत झाली आहे. वागळे पोलिस ठाण्यातून कागदपत्रे आल्यावर मांडवी पोलिसांनी मंगळवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# माणिकपूरला दुचाकीची चोरी



नालासोपारा : वसईच्या विशालनगर येथील काका सोसायटीत राहणाऱ्या मिथिलेश गिरी (वय ४३) यांची १ लाख १५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. त्यांनी २८ ऑक्टोबरला सकाळी वसई रेल्वे कॉलनीच्या समोरील प्लॅटफॉर्म नंबर दोन येथे उघड्यावर पार्किंग केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याने मंगळवारी माणिकपूर पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान क्र. 3

# रिसॉर्टमध्ये बुडून तरुणाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अर्नाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका रिसॉर्टमधील स्वीमिंग पूलमध्ये एका २५ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी संध्याकाळी घडली. सत्येंद्रकुमार रामकुमार सरोज (वय २५) असे मृताचे नाव असून तो भिवंडी येथील रहिवासी आहे.

नालासोपारा येथील शेषमणी पाल यांच्याकडे आलेले सत्येंद्रकुमार व अन्य तिघे पाहुणे अर्नाळा येथील विसावा रिसॉर्टमध्ये गेले होते. यावेळी सत्येंद्रकुमारने स्वीमिंग पूलमध्ये उडी मारली पण तो पाण्याच्या वर आलाच नाही. तेव्हा तातडीने त्याला बाहेर काढले असतां तो जोरजोराने श्वास घेत असल्याचे लक्षात आले. त्यास नजिकच्या रुग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषित केले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पू. पान क्र. ३

## भाईंदरमधून दुचाकी चोरीला



मीरा रोड : भाईदर पश्चिमेच्या नेहरूनगर भागात राहणारे इब्राहिम चौधरी यांनी त्यांची दुचाकी नाझरेथ शाळेच्या जवळील महापालिका कार्यालयालगत ४ नोव्हेंबरच्या रात्री उभी केली होती. दुचाकी चोरीला गेल्याचे आढळून आल्याने या प्रकरणी ५ नोव्हेंबर रोजी रात्री भाईंदर पोलिस ठाण्यात ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस दुचाकी व चोराचा शोध घेत आहेत.

## पैशांवरून मारहाण



मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या राणी सती इमारतीत राहणार पवनकुमार राय यांनी अक्षय अशोक मिश्रा (रा.पूनम कॉम्प्लेक्स, मीरा रोड) यांच्याकडून प्लास्टीक पिशव्या घेतल्या होत्या व त्याचे ४ हजार रुपये देणे बाकी होते. अक्षय याने पैसे मागितले असता, दिवाळीनंतर देतो, असे पवन याने सांगितल्याने त्याचा राग येऊन अक्षय याने टाइमलेस हॉटेल भागात शिवीगाळ, मारहाण करून डावे मनगट जोराने पिरगळून धक्का देऊन पाडले. त्यात राय याचे मनगट फ्रॅक्चर झाले. या प्रकरणी ५ नोव्हेंबरच्या रात्री मीरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# मीरा-भाईंदरमध्ये नशेडींना पकडले



लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडच्या ऑर्बिट रुग्णालयाच्या बाजूला पडक्या इमारतीत विनयकुमार राम जनम बिंद (वय २३, रा. मीरा गावठाण) याला गांजाची नशा करताना ५ नोव्हेंबरच्या रात्री पकडण्यात आले. धीरज जगतसिंग गुरखा (वय ३७) ओम हरिनाम सोसायटी, मीरा गावठाण याला एमआयसीएल बिल्डिंगजवळ गांजा ओढताना पकडण्यात आले. दोन्ही प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

मीरा रोडच्या हटकेश, विनयनगर येथील लोधा मॅक्झिमा इमारतीच्या मागील मोकळ्या जागेत सरवन परशुराम बढई (रा. उपाध्याय चाळ, दहिसर पूर्व) याला गांजा ओढताना पकडून काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

नवघर पोलिस ठाणे हद्दीत इंद्रलोक फेज ६, म्हाडा बिल्डिंगजवळ श्रवण अमरजीत पटेल (वय १९, रा. गोडदेव नाका, भाईंदर पूर्व) व गणेश यशवंत पुजारी (रा. म्हाडा बिल्डिंग, इंद्रलोक फेज-६) या दोघांना पकडले. दोघांवर नवघर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. मीरा रोडच्या सरदार वल्लभभाई पटेल शाळेसमोरील झोपडपट्टी येथे आलामिन अब्दुल हलन मुल्ला याला मीरा रोड पोलिसांनी गांजाची नशा करताना पकडले व गुन्हा दाखल केला आहे.

## घरातून सोन्याचा हार चोरीला



मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट फेज १, जय अंबे निवासमध्ये राहणाऱ्या इंदू गौतम शर्मा यांच्या राहत्या घरातील कपाटातून ६० हजार रुपये किमतीचा साडेसात ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार चोरीला गेला. या प्रकरणी ५ नोव्हेंबर रोजी नवघर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक श्रीनिवास गारळे हे तपास करत आहेत.

## गळफास घेत आत्महत्या



नालासोपारा : चंदनसार रोडवरील गासकोपरी येथील जय जीवदानी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सोनी बदन (वय १८) या तरुणीने आत्महत्या केली आहे. तिने मंगळवारी कोणत्या तरी कारणावरून घरामधील पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. विरार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. विरार पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 7

# उपचाराअभावी मृत्यूच्या चौकशीसाठी नेमली समिती

## अपघात प्रकरणी बसचालकाविरोधात गुन्हा

।मीरा रोड - भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथे सोमवारी मध्यरात्री रिक्षा व बसचा अपघात झाला होता. या अपघातातील जखमीवर पंडित भिमसेन जोशी रुग्णालयातील डॉक्टरांनी जखमीवर वेळेवर उपचार केले नसल्यामुळे एका जखमीचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी रुग्णालय प्रशासनाने चौकशीसाठी तीन जणांची समिती नेमली आहे. या अपघातात बसचालक सुरेश मडीवाल विरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

भाईंदरच्या मुर्धाखाडी, जय बामणदेवनगर येथे राहणारे बाला त्रिभुवन राजभर (३०) हे रिक्षाचालक, त्यांची पत्नी अनिता राजभर (२८), चार वर्षांची मुलगी व दिवाळीसाठी आलेला भाचा पंकज मनिलाल राजभर (१८) यांना घेऊन उत्तनला चालले होते. त्यावेळी उत्तन चौकवरून मीरा- भाईंदर महापालिकेची परिवहन बस भाईदर स्थानकाच्या दिशेने जात होती.

त्यावेळी डोंगरी येथील तीव्र वळणावर रिक्षा आणि बसमध्ये अपघात झाला. त्यात रिक्षाचे मोठे नुकसान होऊन बाला, अनिता, निकिता व पंकज हे गंभीर जखमी झाले. अतिशय गंभीर अवस्थेत असलेल्या चौघांना भाईंदरच्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात रिक्षात टाकून रिक्षावाले घेऊन आले. परंतु गंभीर जखमींना रुग्णालयात उपचारासाठी घेतले नाही. तसेच शताब्दी रुग्णालयात घेऊन जा, असे सांगितले. त्यांना शताब्दी रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णवाहिका तत्काळ उपलब्ध करून दिली नाही. रुग्णालयात घेऊन जात असताना एकाचा मृत्यू झाला. त्यामुळे रिक्षाचालक संतप्त झाले.

◆या घटनेनंतर संतप्त रिक्षाचालकांनी भाईंदर स्थानकाजवळ रिक्षाबंद आंदोलन केले. त्यानंतर सरकारी रुग्णालयाचे ज़िल्हा शल्यचिकित्सक डॉ. जाफर तडवी यांनी चौकशी समिती नेमली आहे. वर्ग १ च्या सर्जन डॉ. तेजस्वी सोनावणे, ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. अल्पेश मिश्रा व वर्ग-२ अधिसेविका पाडवी या तिघांची समिती नेमली आहे. या घटनेची चौकशी करून अहवाल सादर केला जाणार आहे. त्या अहवालानंतर दोषींवर कारवाई केली जाईल, असे डॉ. तडवी यांनी सांगितले.



# दुचाकी चोरट्याच्या मुसक्या आवळल्या

।वसई : चोरीची दुचाकी विकण्यासाठी आलेल्या चोरट्याच्या मुसक्या आवळत त्याच्याकडून तीन दुचाकी हस्तगत करण्याची कामगिरी मध्यवर्ती गुन्हे शाखेने केली आहे.

एक संशयित चोरीची दुचाकी विकण्यासाठी अलकापुरी नालासोपारा (पूर्व)येथे येणार असल्याची माहिती उपनिरीक्षक हितेंद्र विचारे यांना मिळाली होती. त्यानुसार महापालिकेच्या सार्वजनिक शौचालया समोर हवालदार राजाराम काळे, संतोष मदने, हनुमंत सूर्यवंशी, अकिल सुतार, साकेत माघाडे यांच्या पथकाने सापळा लावून अरबाजहुसेन अब्दुलसलाम शेख याच्या मुसक्या आवळल्या.

त्याची कसून चौकशी केल्यावर पेल्हार, माणिकपूर, भोईवाडा पोलीस ठाणे हद्दीत चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले. तसेच त्याच्याकडून तिन्ही गुन्ह्यातील चोरीला गेलेल्या तीन दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, धनंजय पोरे, उपनिरीक्षक हितेंद्र विचारे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीमंत जेधे, आसिफ मुल्ला, हवालदार हनुमंत सूर्यवंशी, राजाराम काळे, संतोष मदने, संग्राम गायकवाड, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अखिल सुतार, साकेत माघाडे, नितीन राठोड, अंगद मुळे यांनी ही कामगिरी बजावली.


CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पू. पान क्र. 1

# अवजड वाहनांच्या माती वाहतुकीमुळे बोळिंज धुळीच्या विळख्यात

## घरांना हादरे बसण्याच्याही रहिवाशांच्या तक्रारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**वसई :** विरार पश्चिमेच्या खारोड बोळिंज येथे माती भरावाच्या अवजड वाहनांची वर्दळ वाढली आहे. यामुळे धूळ, माती रस्त्यावर पडून त्याचा त्रास येथील रहिवाशांना सहन करावा लागत आहे. तर अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे घरांना हादरे बसू लागले असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

विरार पश्चिमेच्या बोळिंज खारोडी मॅट्रिक शाळेच्या शेजारी महापालिकेने सर्व्हे क्रमांक ३९९ मध्ये वॉटर चॅनल, रिंग रूट यासह अन्य कामांसाठी जागा आरक्षित केली आहे. आरक्षित जागेत अतिक्रमण होऊ नये यासाठी महापालिकेने सदर जागेत माती भराव टाकून जागेला कुंपण घालण्याचे काम सुरू केले आहे. या माती भरावासाठी मोठ्या प्रमाणात मातीने भरलेली अवजड वाहने ये-जा करू लागली आहेत.

या वाहनांतून मोठ्या प्रमाणात धूळ, माती, चाकांना लागून आलेला चिखल हा रहदारी असलेल्या मुख्य रस्त्यावर पडू लागला आहे. त्यामुळे या परिसरात धुळीचे साम्राज्य तयार होऊन प्रदूषण होऊ लागले आहे. याचा त्रास या भागात राहणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत आहे. या धुळीमुळे नागरिकांना श्वसनाचे आजार होण्याची शक्यता आहे.

तर दुसरीकडे ज्या रस्त्यावरून वाहने नेली जात आहेत ते वजन वाहण्यासाठी तो रस्ता सक्षम नसताना त्यावरून सर्रासपणे वाहतूक सुरू आहे. त्यामुळे इमारत, घरांना याचे हादरे बसू लागले आहेत असे येथील नागरिकांनी सांगितले आहे. याच परिसरात मॅट्रिक्स शाळा आहे. याच रस्त्यावरून शाळेच्या बस, मुले व येथील रहिवासी प्रवास करतात. मोठ्या अवजड वाहनांमुळे येथे वाहतुकीची समस्या निर्माण होते व भविष्यात अपघात होण्याची शक्यता आहे असे येथील नागरिक आशीष कदम यांनी सांगितले आहे.

हे काम करताना नागरिकांना त्रास होणार नाही याची कोणतीच काळजी घेतली नाही, असा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

या माती भरावाच्या त्रासामुळे येथील नागरिकांनी याबाबत महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्याकडे तक्रार करून यावर तोडगा काढण्याची मागणी केली आहे.

# शिवसेनेच्या कंटेनर शाखेवरील कारवाईकडे दुर्लक्ष

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात पदपथ, मुख्य चौक आणि बस स्थानकावर उभारण्यात आलेल्या शिवसेनेच्या कंटेनर शाखांना महापालिकेने अभय दिले आहे. परिणामी मागील वर्षभरापासून नागरिकांकडून तक्रारी करण्यात आल्यानंतरही कारवाई करण्याकडे प्रशासनाने पाठ फिरवली आहे.

साधारण नोव्हेंबर (२०२३) महिन्याच्या सुरुवातीला मिरा रोड व भाईंदर शहरातील अनेक भागांत रस्त्यावर तसेच पदपथावर कंटेनर ठेवून जवळपास ११ ठिकाणी शिवसेना शिंदे गटाच्या शाखा उभारण्यात आल्या आहेत. या शाखांचे उद्घाटन स्थानिक आमदार प्रताप सरनाईकांच्या हस्ते करण्यात आले होते. कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेल्या या शाखांवर भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) वगळता सर्वच राजकीय पक्षांनी आक्षेप घेतला होता. तर अशा शाखांना पुरवण्यात आलेल्या बेकायदेशीर वीज जोडणीवर अदानी वीज समूहाकडून तीन वेळा कारवाई करण्यात आली होती.

मात्र राजकीय पुढाऱ्यांच्या दबावामुळे महापालिकेने याकडे दुर्लक्ष केले होते. यास आता एक वर्षाहून अधिक कालावधी पूर्ण झाला आहे. मध्यंतरी काही राजकीय पक्षांच्या कार्यालयांविरोधात महापालिकेने कारवाईची मोहीम घेतली होती. मात्र अवघ्या काही दिवसांत ती गुंडाळण्यात आली. तर सध्या आचारसंहिता लागू असल्यामुळे सदर कंटेनर शाखा काळ्या कपड्याने झाकून ठेवल्या आहेत.

दरम्यान, सदर कंटेनर शाखांचा कोणताही वापर केला जात नाही. ते हटवण्याचे आदेश नुकतेच प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती महापालिकेची अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांनी दिली आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. 1

# वसईत मत टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न

## विधानसभा क्षेत्रात व्याख्यानमाला, पथनाट्यांचे आयोजन

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई:** वसई विधानसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी स्वीप उपक्रमातून जनजागृती करण्यात येत आहे. व्याख्यानमाला, पथनाट्य यांसह अन्य कार्यक्रम राबवून मतदारराजापर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यामुळे निवडणुकांच्या प्रशासकीय कामांनाही वेग आला आहे. १३३ वसई विधानसभा मतदारसंघातून मतांचा टक्का वाढावा यासाठी विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. नुकताच वसईत संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालयात मतदान जनजागृती पर व्याख्यान पार पडले. या वेळी विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. संतोष दळवी, वसई विरार मिरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, स्वीप जिल्हा नोडल अधिकारी विजया जाधव, निवडणूक निर्णय अधिकारी संदीप चव्हाण, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अविनाश कोष्टी, संगीता भांगरे, स्वीप अधिकारी गौरी पाटील, मयूर साळवे उपस्थित होते. यावेळी मतदारांच्या अडचणी, मतदानाचे महत्त्व अशी सर्व माहिती त्यांच्या पर्यंत पोहचली पाहिजे यासाठी बूथ जनजागृती गटातील बीएलओ, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, मदतनीस, रेशनिंग दुकानदार यांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

जे नव मतदार आहेत त्यांनी ही जागृक नागरिक म्हणून आपले मत मोलाचे आहे याबाबत ही जनजागृती करण्याच्या सूचना नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.






वसई विधानसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

### मतदारांना आवाहन

वसई विधानसभा मतदारसंघात मागील विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानापेक्षा अधिक मतदान कसे होईल यावर वसईच्या निवडणूक विभागाने भर दिला आहे. २०१९ मध्ये वसईत ६२.४३ टक्के मतदान झाले होते. तोच आकडा २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत वाढेल यासाठी जनजागृती केली जात आहे, असे सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार डॉ. अविनाश कोष्टी यांनी सांगितले आहे. वसई मतदारसंघात ३५४ मतदान केंद्रे असून आतापर्यंत ३ लाख ५४ हजार ६८३ इतक्या मतदारांची नोंदणी झाली आहे. मतदानाच्या दिवशी मोठ्या संख्येने घराच्या बाहेर पडून मतदान करावे असे आवाहनही कोष्टी यांनी केले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. 4

# वसईत महाविकास आघाडीच्या बैठकांना जोर



लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** वसईत महाविकास आघाडीतील बंड थंड झाल्यानंतर आता महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील यांच्या प्रचार बैठकांना जोर आला आहे. महाविकास आघाडीतील सर्वपक्षीय कार्यकर्ते व सामाजिक संस्थांचे प्रमुख यांच्याशी संवाद सुरू केला आहे.

महाविकास आघाडीतर्फे वसईतून काँग्रेसचे विजय पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र काँग्रेसला उमेदवारी दिल्याने शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने नाराजी व्यक्त करीत बंड केले होते. मात्र वरिष्ठ नेते यांच्या मनधरणीमुळे हे बंड शमले. त्यामुळे आता नाराज झालेले पदाधिकारी व कार्यकर्ते पुन्हा एकदा एकत्र आले आहेत.

मंगळवारपासून महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील यांनी प्रचाराचा शुभारंभ केला असून महाविकास आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. विजय पाटील यांनी वसईच्या अंबाडी रोड येथील पंचवटी येथील शाखेत आणि चुळणा गावातील रुबी बँक्वेट हॉलमध्ये महाविकास आघाडीच्या घटक पक्षांतील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत सर्व कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसह प्रचाराचे नियोजन केले तसेच प्रचारासाठी येणाऱ्या अडचणी आणि इतर बाबींवर चर्चा केली आहे. या वेळी वसईतील महाविकास आघाडीतील प्रमुख नेते व पदाधिकारी उपस्थित होते.

# 'तिकीट वाटपात पक्षाची दुसऱ्यांदा चूक'

लोकसत्ता वार्ताहर



**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात उमेदवार देण्यास भाजप श्रेष्ठींनी दुसऱ्यांदा चूक केली आहे, असा आरोप करत आपण ही चूक पुन्हा सुधारून पक्षाला दाखवून देऊ, असा निर्धार गीता जैन यांनी केला आहे.

ऐन वेळी महायुतीतर्फे तिकीट कापण्यात आल्यानंतर गीता जैन पुन्हा अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. मंगळवारपासून त्यांनी जाहीर प्रचाराला सुरुवात केली. भाईंदर पश्चिम येथील शिवसेना गल्ली भागात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी भाजपने दुसऱ्यांदा उमेदवारी नाकारल्यामुळे त्यांनी जनतेसमोर दुःख व्यक्त केले. तसेच ही पक्षाने केलेली चूक असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्याला जनतेचे समर्थन असून पुन्हा निवडणूक जिंकणार असल्याचा दावा जैन यांनी केला. तसेच नरेंद्र मोदी हेच प्रेरणास्थान असल्याचे म्हणत भाजपलाच समर्थन असल्याचे त्यांनी जाहीर केले. तसेच नरेंद्र मेहता यांच्यावर त्यांनी गंभीर आरोप केले.


CamScanner
Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पान क्र. 1

# भाईंदरमध्ये प्रचाराला वेग

## घरोघरी जाऊन भेटी, सभा घेण्यावर उमेदवारांचा भर

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**





दिवाळीचा सण संपताच मिरा-भाईंदर मतदारसंघात विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला आहे. मॉर्निंग वॉक, रेल्वेस्थानकात प्रवाशांशी चर्चा तसेच घरोघरी जाऊन नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या जात आहेत. तसेच चौकाचौकात सभा आयोजित करत अधिकाअधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवारांकडून केला जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मिरा-भाईंदरमध्ये प्रामुख्याने भाजप वगळता इतर पक्षांनी लवकर उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र, भाजपकडून कोणाला तिकीट मिळणार हे स्पष्ट नसल्याने विरोधी उमेदवारांकडून प्रचाराला सुरुवात झाली नव्हती. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणी भाजपकडून उमेदवार जाहीर करण्यात आला. त्यानंतर चार ते पाच दिवस दिवाळी असल्याने प्रचार सुरू करण्यात आला नव्हता. आता दिवाळी संपताच प्रचाराला जोर आला आहे. गल्लीबोळात, रस्त्यांवर, सोसायट्यांमध्ये असे सर्वत्र विविध पक्षांचे कार्यकर्ते झेंडे फडकवत उमेदवारांच्या नावाने घोषणाबाजी करत फिरत असल्याचे पाहायला मिळत आहेत.

भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांनी काही दिवसांपासून भाईंदर पश्चिम, पेणकरपाडा व इतर परिसरात नागरिकांच्या घरोघरी जाऊन प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यांच्याकडून गर्दीच्या ठिकाणी सभादेखील घेतल्या जात आहेत. यासह रेल्वे प्रवाशांशी स्थानकात जाऊन चर्चा करीत आहेत. तर, काँग्रेसचे मुझफ्फर हुसेन शितल नगर, शांतीनगर, उत्तन, नयानगर आदी भागात रॅली काढून प्रचार सुरू केला आहे. तर, अपक्ष उमेदवार गीता जैन यांनी मंगळवारी भाईंदर पश्चिमेला पहिली सभा आयोजित करीत प्रचाराला सुरुवात केली आहे.

इतर अपक्ष उमेदवारही प्रचारासाठी रस्त्यावर उतरले आहेत. ओवळा-माजिवडाचे शिवसेनेचे उमेदवार प्रताप सरनाईक यांनी देखील मिरा-भाईंदर परिसरात बुधवारपासून प्रचार सुरू केला आहे. प्रचारदरम्यान उमेदवार प्रार्थनास्थळांनाभेटी देत आहेत. येथे नागरिकांसह धर्मगुरूंशीदेखील संवाद साधला जात आहे. तसेच सांस्कृतिक व इतर कार्यक्रमांना देखील इच्छुक उमेदवार आवर्जून हजेरी लावताना दिसत आहेत. समाजमाध्यमांचा वापर करून घेत नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोठ्या प्रमाणात सर्वच उमेदवार प्रयत्न करीत असल्याचे पाहायला मिळत आहे.

### उमेदवारांची धावाधाव

निवडणुकीचा प्रचार संपण्यासाठी अवघे दहा दिवस शिल्लक आहेत. या कालावधीत संपूर्ण शहरातील नागरिकांपर्यंत पोहचणे अशक्य आहे. तरीही उमेदवारांची जोर लावला आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत उमेदवार प्रचार करीत असल्याचे पाहायला मिळत आहे. यादरम्यान उमेदवारांची धावाधाव होते आहे. काही ठिकाणी उमेदवारांच्या गैरहजेरीत राजकीय पक्षांचे पदाधिकारी प्रचार करत असल्याचे दिसून येत आहे.


CamScanner
Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पान क्र. 1

# वसईतून ९ पिस्तुल, २१ काडतुसे जप्त

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कारवाई**

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



निवडणुकीच्या तोंडावर मिरा -भाईंदर, वसई - विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा २ च्या पथकाने ९ देशी पिस्तुल, २१ जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त केला आहे. पोलिसांनी याप्रकरणी ८ जणांना अटक केली असून त्यांच्याकडून शस्त्रे साठविण्यामागचा हेतू तपासला जात आहे.

विधानसभा निवडणुका सध्या जाहीर झाल्या असून प्रचाराला सुरुवात झाली आहे. या काळात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची ठिकठिकाणी तपासणी आणि कारवाई सुरू आहे. अशातच मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा क्रमांक २ च्या पथकाला वसईच्या सुरूची बाग परिसरात असलेल्या एका तरूणाकडे पिस्तुल असल्याची माहिती मिळाली होती. त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांच्याकडे एक पिस्तुल आणि जिवंत काडतुसे सापडली. त्याची कसून चौकशी केली असता अवैध पिस्तूल खरेदी करणारे व पुरविणाऱ्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने गुजरात आणि उत्तरप्रदेश येथे सापळा लावून एकूण ८ जणांना अटक केली. त्यांच्याकडून ३ लाख ८३ हजार ३०० रुपये किमतीचे ९ देशी पिस्तूल आणि २१ जिवंत काडतुसे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ चे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, सागर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अजित गिते, रमेश भोसले, संजय नवले, रवींद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र. 4

## 10 दिन पहले डंपिंग ग्राउंड के कचरे में लगी थी आग


# वसईकरों का दम घोंट रहा है भोयदापाडा का सुलगता कचरा

■ निज संवाददाता, वसई

**तीस लाख** आबादी वाले वसई-विरार में तीन विधायक और एक सांसद हैं। मुंबई से सटे होने के बाद भी यहां की जनता तक विकास व बुनियादी सुविधाएं नहीं पहुंच सकी हैं। अधर में लटकी भोयदापाडा डंपिंग की समस्या भी आज तक नहीं सुलझ सकी है। पिछले दस दिनों से डंपिंग ग्राउंड के कचरे में आग लगी है, पूरा इलाका धुंआ-धुंआ हो गया है, लोगों को सांस लेने में दिक्कतें हो रही हैं, लेकिन डंपिंग का सुलगते कचरे से निजात नहीं मिल सकी है।

### 700 टन कचरा किया जाता है डंप

वसई पूर्व के राजीवली में भोयदापाडा के पास जो डंपिंग ग्राउंड है, वहां रोजाना लगभग सात सौ टन कचरा डंप किया जाता है। कचरे पर डीकम्पोस्ट, सैनिटरी लैंड एंड फिलिंग, खाद व बायोमिथाइन गैस जैसी कोई प्रक्रिया नहीं होती, जिससे यहां कचरे की चट्टान खड़ी हो चुकी है। पिछले दस दिनों से कचरे में आग लगी है। कचरे से निकलने वाला धुआं लोगों का दम घोंट रहा है। तरह-तरह की बीमारियां फैल रही हैं। प्रशासन की लापरवाही व जनप्रतिनिधियों की अनदेखी आम लोगों पर भारी पड़ रही है। रात के समय ऐसे हालात हो जाते हैं मानो पूरे क्षेत्र में कोहरा फैल गया हो। धुएं व कचरे से निकलने वाले गंदे पानी से पर्यावरण को भारी नुकसान पहुंच रहा है।



### क्या कहते हैं नागरिक

**स्थानीय लोगों** का कहना है कि हर साल केंद्र व राज्य सरकार की ओर से डंपिंग की प्रक्रिया पर करोड़ों रुपये का बजट आता है, लेकिन वह रकम कहां खर्च की जाती है, इस बारे में किसी को नही पता चल पाता।

डंपिंग ग्राउंड के आसपास रहने वालो का कहना है कि हर चुनाव में हमे राजनीतिक दलो की ओर से यह विश्वास दिलाया जाता रहा है कि जल्द ही कचरे की दुर्गंध व धुएं से मुक्ति मिल जाएगी, लेकिन यह समस्या खत्म होने की बजाय और भी बढ़ती जा रही है। भोयदापाडा में रहने वाले अरुण गावडे ने बताया कि पहले से ही यहां अवैध क्रेशर मशीनों, आरएमसी प्लांट व सड़कों से उड़ने वाली धूल मिट्टी से वसईकर परेशान है। अब डंपिंग में आग लगने से पूरा क्षेत्र प्रदूषित हो रहा है। कचरा



जलने की बदबू से लोगो का जीना दूभर हो गया है। पिछले लोकसभा चुनाव में डंपिंग समस्या को दूर करने का वादा किया गया था, लेकिन चुनाव जीतने के बाद कोई देखने नही आया है। इस संबंध में जब सांसद डॉ हेमंत सावरा और मनपा उपायुक्त नाना साहेब कामठे से संपर्क किया गया, तो उन्होंने फोन नही उठाया।

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पान क्र. 3

# विरार: रिजॉर्ट के स्विमिंग पूल में डूबने से युवक की मौत

## जांच में जुटी पुलिस

भास्कर संवाददाता । विरार



विरार पश्चिम स्थित एक रिजॉर्ट के स्विमिंग पूल में डूबने से युवक की मौत हो गई। नालासोपारा का एक समूह मंगलवार को पिकनिक मनाने के लिए विसावा रिजॉर्ट आया था। मृतक युवक की पहचान सत्येंद्र कुमार राजकुमार सरोज के रूप में हुई है। पुलिस ने बताया कि भिवंडी निवासी सत्येंद्र कुमार पिकनिक मनाने के लिए नालासोपारा पूर्व ओसवाल नगरी में रहनेवाले दोस्तों के पास आया था। सभी दोस्त विसावा रिजॉर्ट गए थे। दोपहर करीब साढ़े तीन बजे सत्येंद्र कुमार ने स्विमिंग पूल में छलांग लगा दी। हालांकि काफी समय बाद भी जब वह पानी से बाहर नहीं आया तो उसके दोस्त चिंतित हो गए और पानी से सत्येंद्र कुमार को बेहोशी की हालत में बाहर निकाला। इस दौरान वह कुछ बोल नहीं पा रहा था। रिजॉर्ट के कर्मचारी और उसके दोस्तों ने उसे अर्नाला महालक्ष्मी अस्पताल में भर्ती कराया, लेकिन उसकी बिगड़ी हालत को देखते हुए विरार पश्चिम के संजीवनी अस्पताल में रेफर किया गया। यहां उपचार के दौरान उसकी मौत हो गई। अर्नाला पुलिस स्टेशन के पुलिस उपनिरीक्षक धनाजी मालोदे बताया कि पुलिस ने दुर्घटना का मामला दर्ज किया है। डॉक्टरों के मुताबिक़, उसकी मौत सिर जमीन पर टकराने से हुई। फिलहाल पुलिस मामले की जांच में जुटी है।

# सर्पदंश से 17 वर्षीय किशोरी की मौत



भास्कर संवाददाता | विरार

विरार निवासी 17 वर्षीय किशोरी काजल महेश भोईर की सर्पदंश से जान चले गई। काजल को रात में सोते समय सांप ने डस लिया था। पुलिस ने बताया कि काजल विरार (पूर्व) सायवान गांव की निवासी है। सर्पदंश के बाद परिवार ने उसे भिवंडी के अस्पताल में भर्ती कराया था। जहां उसकी हालत बिगड़ी जा रही थी।

डॉक्टरों की सलाह पर परिवार ने ठाणे जिला अस्पताल में भर्ती कराया, लेकिन उपचार के दौरान उसकी मौत हो गई। मंडावी पुलिस ने जांच पड़ताल कर दुर्घटना का मामला दर्ज किया है। फिलहाल मामले की जांच चल रही है।

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

THE TIMES OF INDIA pag.- No.-06



# Shift man 'physically abused' by police to hospital, says HC

Swati Deshpande
@timesofindia.com

**Mumbai:** The Bombay High Court vacation bench on Wednesday directed that a man arrested at around 3 am on Nov 5 by Mira-Bhayandar, Vasai-Virar police be shifted to JJ Hospital immediately after a court's medical officer's report confirmed his brother's allegations that police physically abused him.

The police arrested Anil Rathod on Nov 4, said his brother Sunil Rathod, who alleged the arrest was "in gross violation of fundamental rights."

Sunil petitioned the vacation court on Tuesday to declare the arrest illegal and alleged his brother was "brutally" assaulted by police, who arrested him in connection with a 2023 FIR lodged against their father at Pelhar police station, Palghar district.

The HC vacation court bench of Justices Arif Doctor and Somasekhar Sundaresan on Wednesday, observing the "very serious and grave allegations of physical abuse," directed the court's own medical officer to examine him.

On Tuesday, after hearing Rathod's counsel at length and seeing photographs produced, the HC issued notice to the state, Maharashtra home minister, and the police commissioner of Mira-Bhayander, Vasai-Virar police. The HC also directed the police chief and the deputy CP to file their replies to the petition, observing that allegations of abuse were serious.

On Wednesday, the HC doctor examined Rathod and submitted a handwritten report on the same day, which the bench noted "supports" the allegations of physical abuse, as argued by counsel Nimay Dave and Priyanka Dubey.

Assistant police commissioner, Bajrang Desai, against whom the petitioner made allegations was present in court on Wednesday on the orders of the court. Rathod was also present in the court.


The HC doctor on examining Anil Rathod's back and spine revealed that he was subjected to trauma and advised further medical examination and treatment. The HC on Wednesday hence said, "We deem it fit to direct the accused to be treated at the JJ Hospital, where he shall be kept overnight for the necessary examinations and required medical treatments, as may be advised by the doctors of the JJ Hospital based on the medical report of the Medical Officer of this Court."

The HC, after also hearing APP Sharmila Kaushik, directed Rathod's custody be handed over to the JJ Marg police station, under whose custody he shall remain until further orders.

The HC will hear the matter again on Thursday for further hearing and passing of appropriate orders.

Scanned with OKEN Scanner

# Gorai village in a sorry state, rights body orders probe



**Pranali Lotlikar**
MUMBAI

The Maharashtra State Human Rights Commission (SHRC) has taken suo motu cognisance of a news report exposing severe infrastructural neglect in Gorai village. According to the report, residents of Gorai have endured inadequate access to essential services such as electricity, water, healthcare, and education for over seven decades since independence.

The SHRC, presided over by Justice KK Tated and MA Sayeed, have ordered an investigation under Section 12 of the Protection of Human Rights Act, 1993, highlighting the human rights implications of the region's ongoing deprivation. "The absence of basic facilities impacts the human rights of numerous individuals in Gorai," the SHRC's order stated. The commission has summoned relevant government authorities, requiring them to conduct a fact-finding inquiry and submit a report by November 18, 2024.

The report, published in a regional newspaper, displayed Gorai village in a sorry state, which is still fighting for basic amenities. The news reports a stark picture of daily life in Gorai, an island located just off Borivali and under the jurisdiction of the BMC. Despite its proximity to urban Mumbai, Gorai has been left without consistent water and electricity supplies, a proper school, or healthcare facilities. Residents needing medical attention often must walk over 15km to reach Bhayandar or take a boat to Borivali for treatment, as there is no hospital on the island.

Furthermore, the report highlighted the village's lack of a functional crematorium. While there is a crematorium along the shore, it becomes inaccessible during high tide, forcing villagers to wait for the waters to recede to conduct last rites.

The news report further added that although Gorai lacks essential services, the island hosts numerous private resorts, elite farmhouses, and vacation properties. This disparity between private development and basic public infrastructure has only added to the residents' frustrations.

Scanned with OKEN Scanner